| MHAK070000702026 | **<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १३/२०२६</u>**<br>मधील निशाणी १ वरील आदेश<br>उषा रतन धनोकार व इतर वि. कोणीही नाही<br>(दिनांक २४ मार्च, २०२६) |
|---|---|

मुंबई नियमन कायदा (Bombay Regulation Act), १८२७ नुसार वारस दाखला मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**अर्जाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे–**

**२.** अर्जदार क्र.१ चे पती, अर्जदार क्र. २ ते ४ चे वडील **रतन वसंतराव धनोकार** हे दिनांक ०२.०४.२०२४ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे मयत झालेले आहे. मयत रतन वसंतराव धनोकार यांची आई, अर्जदार क्र. १ ची सासु व अर्जदार २ ते ४ ची आजी कलावतीबाई वसंतराव धनोकार हया दिनांक ११.०६.२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच मयत रतन वसंतराव धनोकार व अर्जदार क्र. १ चा मुलगा, अर्जदार क्र. २ ते ४ चा भाऊ नामे भुषण रतन धनोकार हा दिनांक ०८.०७.२०१६ रोजी अविवाहीत मयत झालेला आहे. मयत रतन वसंतराव धनोकार यांच्या मृत्युनंतर अर्जदार क्र.१ त्यांची पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ मुले आणि अर्जदार क्र. ४ मुलगी असुन अर्जदारांव्यतिरिक्त त्यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

**३.** अर्जदारांना शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ घेणेकरीता, तसेच स्थावर व जंगम मालमत्तेची वारसांची नोंद करणेकरीता मयत रतन वसंतराव धनोकार यांचे मृत्युपश्चात वारस असल्याबाबत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**४.** प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर हरकतीसाठी न्यायालयाकडुन अर्जाची सायटेशन नोटीस (निशाणी क्र.६) प्रमाणे काढण्यात आली. दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दैनिक 'विदर्भ मतदार' या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन (निशाणी क्र.९) प्रसिध्द करण्यात आले. प्रस्तुत अर्जावर कोणाचा आक्षेप असल्यास हजर राहुन नोंदवण्याबाबत आवाहन करण्यात आले परंतु सदर अर्जाला कोणीही हरकत घेतली नाही.

**५.** अर्जदार क्र. ३ गौरवकुमार रतन धनोकार यांनी त्यांच्या कथनापुष्टयर्थ त्यांचे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १९ वर दाखल करुन त्यांच्या सरतपासाच्या

प्रतिज्ञापत्रात अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केलेली आहे. अर्जदार यांनी यादी (नि.क्र.४) सोबत त्यांच्या कथनाला बळकटी मिळावी म्हणुन मयत रतन वसंतराव धनोकार, कलावतीबाई वसंतराव धनोकार व भुषण रतन धनोकार यांच्या मृत्यु प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती (अनुक्रमे नि.क्र.११ ते १३) व अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या आधार कार्डच्या सत्यापित प्रती (नि.क्र. १४ ते १७) इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

**६.** सदर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, रतन वसंतराव धनोकार हे दिनांक ०२.०४.२०२४ रोजी, त्यांची आई कलावतीबाई वसंतराव धनोकार हया दिनांक ११.०६.२०२१ रोजी व मयताचा मुलगा नामे भुषण रतन धनोकार हे दिनांक ०८.०७.२०१६ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे मयत रतन वसंतराव धनोकार यांना अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. वरील सर्व बाबींचा विचार करता, अर्जदार क्र. १ ते ४ हे हिंदु वारसा कायदयाच्या तरतुदीप्रमाणे मयत रतन धनोकारचे वर्ग–१ मधील वारस असल्याचे दिसून येते. अर्जदारांनी दिलेल्या आधारकार्डच्या प्रतींवरुन अर्जदारांची ओळख निश्चित होते. महत्वाची बाब म्हणजे अर्जदारांच्या अर्जाला कोणीही आवाहन दिलेले नाही, तसेच कोणीही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे अर्जदारांच्या पुराव्यावर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण मला निदर्शनास येत नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत रतन वसंतराव धनोकार यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदारांची वारस दाखला मिळण्याची मागणी त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने मंजुर करणे न्यायोचित असल्याचे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** अर्जदार क्र. १ उषा रतन धनोकार, अर्जदार क्र. २ वैभव रतन धनोकार, अर्जदार क्र. ३ गौरवकुमार रतन धनोकार आणि अर्जदार क्र. ४ शुभांगी प्रमोद मसने हे **मयत रतन वसंतराव धनोकार** यांचे कायदेशीर वारस आहेत.

३. अर्जदार यांना मुंबई नियमन कायदा (Bombay Regulation Act)१८२७ चे कलम ८ नुसार नमुना परिशिष्ट 'ब' मध्ये वारसा दाखला योग्य ते मुद्रांक शुल्क आकारुन देण्यात यावा.

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.03.25 11:18:44 +0530

दिनांक : २४.०३.२०२६.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 24/03/2026 |
| Order signed by P.O on | :- | 24/03/2026 |
| Order uploaded on | :- | 25/03/2026 |